महाराष्ट्र विनियोजन अधिनियम २०१२

सन २०१२-२०१३ चे अनुदान वितरण

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प,
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ नोव्हेंबर, २०१२.

संदर्भ:- १) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. बीजीटी-२०.१२/प्र.क्र. ५५/अर्थसंकल्प-३ दिनांक ३१ मार्च, २०१२ चे पत्र तसेच शासन परिपत्रक क्र. अंदाज २०.१२/प्र.क्र. ६४/ २०१२/अर्थसंकल्प-३ दिनांक ४ मे, २०१२

२) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ०९ एप्रिल, २०१२

३) शासन शुध्दीपत्रक क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १८ एप्रिल, २०१२

४) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ७ मे, २०१२

५) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ४ जून, २०१२

६) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १२ जून, २०१२

७) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १५ जून, २०१२

८) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १६ जून, २०१२

९) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १ जुलै, २०१२

१०) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ११ जुलै, २०१२

११) शासन शुध्दीपत्रक क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १२ जुलै, २०१२

१२) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १७ जुलै, २०१२

१३) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक २६ जुलै, २०१२

१४) शासन निर्णय क्र. पुनर्वि २८१२/(७०/१२)/अर्थसंकल्प, दिनांक २७ ऑगस्ट, २०१२

१५) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ३० ऑगस्ट, २०१२

१६) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक ४ सप्टेंबर, २०१२

१७) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १४ सप्टेंबर, २०१२

१८) शासन निर्णय क्र. असंअं-२५१२/(४९/१२)/अर्थसंकल्प, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१२

**प्रस्तावना :-**

वित्त विभागाकडून बीम्स प्रणालीवर प्राप्त झालेला अनुदानाचा निधी नियंत्रक अधिकारी सहसचिव (प्रशासन), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई आणि शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१२-१३ या आर्थिक वर्षातील शालेय शिक्षण व क्रीडा विभागासाठी अनुदानाव्दारे अर्थसंकल्पित झालेला व वित्त विभागाकडून BEAMS प्रणालीवर प्राप्त झालेला निधी BEAMS प्रणालीवर दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१२ व ९ नोव्हेंबर, २०१२ रोजी वितरीत करण्यात आलेला आहे. सदर निधी पुढीलप्रमाणे नियंत्रण अधिकाऱ्यांच्या अधिनस्त ठेवण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.

(रुपये हजारात)

| अ.क्र. | लेखाशीर्ष | नियंत्रक अधिकारी | वितरित अनुदान |
|---|---|---|---|
| | **मा. क्र. ई - ५, ७६१० शासकीय कर्मचारी इत्यादींना कर्जे** | | |
| १ | ७६१०, शासकीय कर्मचारी , इत्यांदीना कर्ज. २०१, घरबांधणी अग्रिमे (००) (००) (०१) घरबांधणी अग्रिमे (७६१० ०२५६) ५५, कर्जे व आगाऊ रकमा | सहसचिव (प्रशासन) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई | ८११.५०० |
| | **मागणी क्रमांक ई - ४, ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च** | | |
| २ | ४२०२ शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यांवरील भांडवली खर्च, ०१ सर्वसाधारण शिक्षण, २०२ माध्यमिक शिक्षण (००) (००) (०२) मुलींसाठी वसतीगृह बांधणे (राज्य हिस्सा) (४२०२६१६६), ५३ मोठी बांधकामे | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे. | १८०० |
| | **मागणी क्रमांक ई - २, २२०२ सर्वसाधारण शिक्षण** | | |
| ३ | २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ - प्राथमिक शिक्षण १०३ - प्राथमिक शिक्षणासाठी स्थानिक संस्थांना सहाय्य (०७) (०४) प्राथमिक शाळेतील अनुसूचित जाती /जमातींच्या विद्यार्थ्यांना विशेष सुविधा (२२०२ ३३०५) | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे. | ५७६७५ |
| ४ | २२०२, सर्वसाधारण शिक्षण, ०१ - प्राथमिक शिक्षण १०३ - प्राथमिक शिक्षणासांठी स्थानिक संस्थांना सहाय्य (०७) (०५) १०३ विकास गटांतील इयत्ता ४ थी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेष व लेखन साहित्य (२२०२ ३३१४) | शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे. | ३६३४५ |

२. सन २०१२-१३ या आर्थिक वर्षात वितरीत केलेला उपरोक्त निधी / अनुदान आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून तातडीने वितरीत करण्यात यावा :-

अ) ज्या उद्देशासाठी निधी / अनुदान मंजूर आहे त्या व्यतिरिक्त इतर उद्देशासाठी खर्च करता येणार नाही. तसेच इतर लेखाशीर्षाकडे वळती करता येणार नाही.

आ) सदर खर्चाचा प्रगती अहवाल मासिक निधी विवरणपत्रानुसार नियंत्रक अधिका-यांनी दरमहा शासनास १० तारखेपर्यंत सादर करावा.

इ) वेतनेत्तर अनुदान वितरीत करताना वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-१०.०८/प्र.क्र.७०/२००८/ विनियम, दि.१५ मे, २००९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-१, उपविभाग एक मधील अनुक्रमांक ६, नियम ४० प्रमाणे सक्षम प्राधिका-यांची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

ई) वेतन अनुदानाची थकबाकी अदा करताना अनुक्रमांक ४, नियम ३९ (ब) टिप-४, अनुक्रमांक ५, नियम ३९, (ब) टिप-५ अन्वये तसेच अनुक्रमांक ६ नियम ४० प्रमाणे सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

उ) महानगरपालिका, नगरपालिका यांना देण्यात येणारी वेतनेत्तर अनुदाने वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय खर्च करता येणार नाहीत.

ऊ) स्थानिक स्वराज्य संस्थांना वेतनेत्तर अनुदाने वितरीत करण्यापूर्वी सदर संस्थांकडून राज्य शासनास येणे असणा-या रकमांचा आढावा घेण्यात यावा व त्या वसूल करुनच उर्वरीत अनुदान वितरीत करण्यात यावे.

ए) खाजगी स्वयंसेवी संस्थांना अनुदान उपलब्ध करुन देताना वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-१, उपविभाग एक मधील अनुक्रमांक २७, नियम १४९ प्रमाणे सक्षम अधिका-याची मान्यता घेवून अनुदान अदा करावे.

ऐ) ज्या तरतूदी वितरणासाठी प्रशासकीय मान्यता आदेशाची आवश्यकता आहे अशा तरतूदी वितरीत करताना भाग-१, उपविभाग-तीन, अनुक्रमांक-चार, नियम २७ (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराप्रमाणे सक्षम प्राधिका-यांच्या मान्यतेने आदेश निर्गमीत झाल्यानंतर अनुदान वितरीत करावे.

ओ) जिल्हा परिषदांसाठीचे वेतनेत्तर अनुदान त्यांचे अनुदान निर्धारण झाल्याशिवाय वितरीत करु नये.

औ) ज्या आहरण व संवितरण अधिकारी यांनी मागील उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झाल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करण्यात येऊ नये

३. शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक १ मधील **अनुक्रमांक** २ करिता वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक २८६/अर्थ-८ दिनांक ३० ऑक्टोबर, २०१२ व अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६०४/व्यय-५ दिनांक १५ ऑक्टोबर, २०१२ **आणि** परिच्छेद क्रमांक १ मधील अनुक्रमांक ३ व ४ करिता वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६२६/व्यय-५ दिनांक २० ऑक्टोबर, २०१२ अन्वये दिलेल्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१२१११२१४४७४८२९२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( र. रा. पेटकर )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे स्वीय सहायक
मा. अपर मुख्य सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहायक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र - १ / २, मुंबई / नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
स्थानिक निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सहसचिव (प्रशासन/प्राथमिक/अर्थसंकल्प/ व उपसचिव (समन्वय/माध्य.) व शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य. / प्राथमिक / प्रौढ व अल्पसंख्यांक / SCERT / महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक (क्रीडा व युवक सेवा) महाराष्ट्र राज्य, पुणे

सर्व क्रीडा उपसंचालक
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / प्रौढ)
सर्व अधिक्षक, वेतन पथक (प्राथमिक / माध्यमिक)
वित्त विभाग, (व्यय-५ / अर्थसंकल्प-६), मंत्रालय, मुंबई
आदिवासी विकास विभाग, (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (केंपुयो / असंक), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग